# : प्रस्तावना :

**'प्रबन्धस्य अभिधेयस्य कल्पना स्वयं रचना'** जे अभिधेय (सांगण्याजोगे) असेल त्याची कल्पनेने स्वतः रचना करणे म्हणजे कथा होय, असे संस्कृत साहित्यात कथेविषयीचे एक लक्षण आहे. कथन करणे ही माणसाची अत्यंत स्वाभाविक प्रवृत्ती आहे. या वृत्तीमुळेच जगाच्या इतिहासात अनेक कथा जन्माला आल्या. कथाकथनाची मौखिक परंपरा सबंध जगातील विविध भाषांमध्ये व विविध मानवसमूहांमध्ये दिसून येते. जगातील सर्व भाषांमध्ये लोककथा, परीकथा, नीतिकथा आणि दैवतकथा ही कथारूपे दिसून येतात. महाभारतातील कथा, पुराणांतील व वेदांतील कथा, बौध्द–जातक कथा, बृहत्कथासार, वेताळपंचविशी, चक्रधरांचा दृष्टांतपाठ, गोष्टीतून गोष्ट निर्माण करणारी पंचतंत्रातील परिमंडळ कथा असे आपल्याकडे कथांचे विविध संदर्भ सापडतात. वैदिक साहित्याप्रमाणेच इजिप्त आणि ग्रीकांच्या साहित्यातही कथा सापडतात. आपल्याकडच्या तेराव्या शतकातील महानुभावीय वाङमयाला समांतर काळात पाश्चात्य साहित्यात चॉसरने लिहिलेल्या 'कॅंटरबरी कथा' आणि बोकाचिओ या इटालियन लेखकाने लिहीलेल्या 'देकामेरॉन कथा' सापडतात वेगवेगळया कालखंडातील व वेगवेगळया भांषातील कथा साहित्यात पुष्कळ विविधता आढळते. त्यामुळे कथेची एकच एक व्याख्या करणे कठीण आहे. वेगवेगळया भाषांच्या मौखिक परंपरेतील कथारूपांनी आधुनिक कथेला खूप काही दिले आहे. असे असले तरी एक वेगळा वाङमयप्रकार म्हणून 19व्या शतकाच्या सुरूवातीपर्यंत लघुकथा हा प्रकार दिसून येत नाही.

19व्या शतकात युरोप व इंग्लंडमध्ये फार मोठया प्रमाणात नियतकालिकांचा उदय झाला. त्यांच्या वाढत्या खपासोबत कमी लांबीच्या कथात्मक साहित्यांची मागणी वाढली. त्यातून अनेक कथा जन्माला आल्या आणि लघुकथा लेखनाचा गांभीर्याने विचार होऊ लागला. 19व्या शतकात जवळजवळ एकाच वेळी जर्मनी, अमेरीका, रशिया आणि फ्रान्स या चार देशात लघुकथा लेखनाची लाट उसळली.

अमेरिकन कथाकार 'एडगर एलन पो' ने केवळ कथा लिहिल्याच नाहीत तर त्याने लघुकथा या वाङमय प्रकाराची लक्षणे स्पष्ट करण्याचाही प्रयत्न केला. 1842 च्या सुमारास लघुकथेच्या उदयाच्या काळातच त्याने ही लक्षणे स्पष्ट केली. मोजकी पात्रे, प्रसंग, वातावरणादी घटक या सर्वांच्या चिरेबंद अशा जुळणीतून कथा आकाराला येते व वाचकाच्या मनावर एकच एक संस्कार ती घडवत असते. हे 'पो'च्या विवेचनाचे सार होते.

मराठीत ना. सी. फडके, वा. ल. कुळकर्णी, रा. भि. जोशी, वसंत दावतर, गंगाधर गाडगीळ, सुधा जोशी यांनी कथेच्या विविध अशा पैलूंचा वेध घेतला असून कथेचा सविस्तर उहापोह केला आहे.

कथा आणि कादंबरी या दोन्ही कथनप्रकारांची चर्चा करताना लक्षात येते. कादंबरीत जीवनाच्या साकल्याचा, समग्रतेचा वेध घेण्याचा प्रयत्न असतो, अशी समग्रता कथेला अभिप्रेत नसते. कथेत मर्यादित जीवनखंडाचे चित्रण साधलेले असते. कथेच्या स्फुट स्वरूपामुळे जीवनाच्या समग्रत्वाचे समावेशन तिच्यात असत नाही. कथेचा चित्रफलक मर्यादित आकाराचा, मर्यादित अवकाश असलेला असतो.

कथा हा स्फुट गद्य कथनात्मक साहित्यप्रकार असून अनुभवाची एकात्मता, एकजिनसीपणा, एकविधता, एककेंद्रित्व मितव्यय, संक्षेप संप्रक्तता, काटेकोरपणा ही तिची वैशिष्टये ठरतात. कथेतील अनुभवांच्या जातकुळीनुसार तिचे भयकथा, गुढकथा, रहस्यकथा, विज्ञानकथा, ग्रामीणकथा, आदिवासी कथा, दलितकथा, विनोदी कथा, स्त्रीवादी कथा इत्यादी विभिन्न प्रकार अस्तित्वात येतात.

मराठी कथेच्या प्रवासात निरनिराळया लेखकांनी वेगवेगळे मांडणीचे, शैलीचे प्रयोग केले. या सर्व प्रयोगांना सामावून घेत कथा अधिकच लवचिक झाली. प्रत्येकच नवा प्रयोग हा प्रवाहांना जन्म देऊ शकला नाही. तरी ज्या अनेक प्रवाहांनी 90नंतरच्या कथेचा प्रवाह समृध्द केला. बदलत्या सामाजिक वातावरणानुसार या कथांचे बहिरंग, भाषा बदलली असली तरी अंतरंग तेच राहिले. सर्वसामान्य वाचकवर्ग भरपूर मिळाल्यामुळे घटनाप्रधान आणि मनोविश्लेषणात्मक कुटुंबकथांचा प्रवाह कायमच मोठा रहिला.

1975 साल आंतरराष्ट्रीय स्त्री वर्ष म्हणून मानले जाते. या निमित्ताने भारतीय स्त्री कार्यकर्त्यांचा पाश्चात्य स्त्री कार्यकर्त्यांच्या पाश्चात्य स्त्रीवादी चळवळीशी, विचारांशी जवळून परिचय आला. यातूनच भारतामध्ये स्त्रीवादी चळवळ सक्रिय झाली. स्त्रीवादी चळवळीने पुरूषप्रधान समाजव्यवस्थेमध्ये होणारे स्त्रीशोषणाचे स्वरूप स्पष्ट केले आहे. संस्कृतीच्या विकासामध्ये स्त्रीला क्रमाक्रमाने प्राप्त झालेले दुय्यम स्थान, कुटूंबात व समाजात स्त्रियांचे होणारे शोषण, स्त्री शरीरावर तसेच तिच्या जननक्षमतेवर पुरूषप्रधान व्यवस्थेने ठेवलेले वर्चस्व, स्त्रियांना सत्ताविहीन ठेवणे या सर्व घटकांवर स्त्रीवादामध्ये लक्ष केंद्रीत केले आहे.

स्त्रीवादी चळवळीने निर्माण केलेला आत्मविश्वास, स्त्रियांना दिलेले नवे आत्मभान, यामुळे स्त्रिया आपल्या कुटुंबाकडे आणि भोवतालाकडे नव्या दृष्टीने पाहू लागल्या. या नव्या जाणीवेतून एकोणीसशे ऐंशीनंतर स्त्रीवादी कथांचा प्रवाह उदयाला आला. स्त्रीवादी कथाकारांमध्ये प्रिया तेंडुलकर, गौरी देशपांडे, सानिया, उर्मिला पवार, मेघना पेठे यांचे लेखन उल्लेखनीय आहे. या लेखिकांनी मध्यमवर्गीय स्त्रीमन कथेतून मोकळे केले आहे. पुरूषप्रधान संस्कृतीने घडविलेल्या स्त्री प्रतिमांचा वेध स्त्रीवादी कथेने घेतला. स्त्री शरीर विशिष्ट अनुभवातून स्त्रीचे शरीर—मन यांच्याकडे बघण्याचा नीती निरपेक्ष दृष्टिकोन त्यांच्या कथांमधून व्यक्त झाला आहे. लैंगिक संवेदनाचे स्त्रियांनी केलेले चित्रण, कुटुंबसंस्था व लग्नसंस्था यांचे पुरूषसत्ताक स्वरूप, कुटुंबात स्त्रीला जाणवणारे

एकटेपण याचे दर्शन स्त्रीवादी कथांमधून घडते. उर्मिला पवार यांच्या कथांमधून दलित स्त्रीने केलेला विद्रोह व्यक्त होतो.

उर्मिला सिरूर, अंबिका सरकार, नीरजा, मोनिका गजेंद्रगडकर, मनस्विनी रविंद्र यांनीही स्त्रीवादी जाणिवेतून कथालेखन केले.

स्त्रीवादी कथांमध्ये प्रामुख्याने शहरी मध्यमवर्ग, उच्च मध्यम वर्गातील स्त्रीचे चित्रण आलेले आहे.

मुक्त अर्थव्यवस्था, तंत्रज्ञानाचा मानवी जीवनावरील परिणाम, मुक्त अर्थव्यवस्थेत स्त्रीचे झालेले वस्तुकरण, स्त्रियांचा राजकारणातील सहभाग, 33टक्के महिला आरक्षणाचे विधेयक, अशा सामाजिक, आर्थिक राजकीय बदलांचे आव्हान मराठी स्त्रीकेंद्री कथेला भविष्यात पेलायचे आहे.